मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेचा 9 हजार 675 कोटींचा अर्थसंकल्प सादर

## हवामान अंदाजपत्रक ठरले नाविन्यपूर्ण : पायाभूत सुविधा, सेवांमध्ये सुधारणा करण्यावर आगामी वर्षात भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आर्थिक वर्ष २०२५-२६ चे अंदाजपत्रक महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीला शुक्रवारी सादर केले. हा अर्थसंकल्प मूळ ६ हजार २५६ कोटी ३९ लाख रूपयांचा तर केंद्र व राज्य शासनाच्या पुरस्कृत योजनांसह ९ हजार ६७५ कोटी २७ लाख रूपयांचा असून नागरिकांचा सहभाग व हवामान अंदाजपत्रक ह्या दोन नावीन्यपूर्ण वैशिष्ट्यांसह हा अर्थसंकल्प सादर करीत असल्याचे यावेळी आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.



याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) प्रविणकुमार जैन, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, प्रभारी नगरसचिव मुकेश कोळप, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, उप आयुक्त विठ्ठल जोशी, सचिन पवार, संदीप खोत, सहाय्यक आयुक्त किशोर ननवरे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफ्फुल पुराणिक यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अर्थसंकल्पाबाबत माहिती देताना आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले की, 'सन २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वी पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचे त्यांनी अंदाजपत्रकामध्ये घेतलेल्या सहभागाबाबत मनःपूर्वक आभार मानतो. पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकाकरिता २ हजार २७९ नागरिकांच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. नागरिकांच्या या सूचना शहराच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. या सूचनांपैकी ७८६ सूचनांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प नागरिकांचा सहभाग व हवामान अंदाजपत्रक ह्या दोन नावीन्यपूर्ण वैशिष्ट्यांसह सादर केला जात आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ५ हजार ८४१ कोटी (शिल्लकेसह) इतकी रक्कम जमा होईल, हे अपेक्षित धरुन सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक मा. प्रशासक यांचे मा. स्थायी समिती मार्फत मा. महापालिका सभेपुढे सादर केले होते. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ६ हजार २५६ कोटी ३९ लाख (आरंभीच्या शिल्लकेसह) उत्पन्न अपेक्षित आहे व त्यात प्रत्यक्षात खर्च ६ हजार २५१ कोटी ३९ लाख होईल. यामध्ये मार्च २०२६ अखेर ५ कोटी इतकी शिल्लक राहील. अर्थसंकल्प हा मूळ ६ हजार २५६ कोटी ३९ लाख रूपयांचा तर केंद्र व राज्य शासनाच्या पुरस्कृत योजनांसह ९ हजार ६७५ कोटी २७ लाख रूपयांचा आहे,'असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या क्षेत्रीय स्तरावरील विकासकामांसाठीही भरीव तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय स्तरावरील विकासकामांसाठी अनुक्रमे १५ कोटी ६ लाख, ७ कोटी ९९ लाख, १८ लाख ९४ लाख, १८ कोटी ९७ लाख, १० कोटी ३५ लाख, २५ कोटी ९६ लाख, १० कोटी ६३ लाख, ३० कोटी २२ लाख रुपये तरतूद करण्यात आली आहे.

मालमत्ता कर सुधारणा यावर भर देताना मालमत्ता कर वसुलीसाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच महापालिकेच्या विविध विभागांसाठी ड्रोन प्रतिमा वापरण्यात येत आहे. पायाभूत सुविधा आणि सेवांमध्ये सुधारणा करण्यावर आगामी वर्षात अधिकाधिक लक्ष केंद्रित केले जाणार आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड महापालिका सिटी सेंटर, अण्णासाहेब मगर स्टेडियम, संविधान भवन, औद्योगिक प्रशिक्षण संस्था उत्कृष्टता केंद्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची नवीन प्रस्तावित मुख्य प्रशासकीय इमारत, डीपी रोड अशा विविध विकास कामांचा समावेश आहे. शहरी गतीशिलता अंतर्गत जंक्शन सुधारणा, हरित सेतू यावर लक्ष दिले जाईल. भामा आसखेड धरण पाणीपुरवठा प्रकल्प, पवना जलवाहिनी पाणी पुरवठा योजना, ड्रेनेज मास्टर प्लॅन, आरोग्याच्या पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण, विविध ठिकाणी अग्निशमन केंद्राची उभारणी, हवामान कृती आराखडा, एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी शुद्धकरून पुनर्वापर, जुन्या टाकलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग, मुळा-पवना-इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, सक्षमा प्रकल्प, लाईटहाऊस कौशल्यम्, प्रधानमंत्री आवास योजना, शाळेसाठी सीसीटीव्ही निरीक्षण प्रकल्प, विविध माध्यमांच्या प्रस्तावित शाळांचे नियोजन, तळवडे येथील जैवविविधता उद्यान, निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय विकसित करणे, छतांवरील एलईडी सोलार पॉवर जनरेशन सिस्टम्स, ईव्ही चार्जिंग सिस्टम्स, सिटी हब फॉर डेटा अँड कम्युनिकेशन आदी प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

### हवामान अंदाजपत्रक फ्रेमवर्क लाँच

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आपले हवामान अंदाजपत्रक फ्रेमवर्क लाँच केले आहे. पिंपरी चिंचवड शहर हे असा दृष्टिकोन स्वीकारणारे जागतिक स्तरावरील निवडक शहरांपैकी एक बनले आहे. हा उपक्रम आर्थिक नियोजनास दीर्घकालीन हवामान उद्दिष्टांसह अधोरेखित करणारा आहे. हवामान अर्थसंकल्प हे सुनिश्चित करतो की, वाटप केलेला प्रत्येक रुपया कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हवामानातील लवचिकता मजबूत करण्यासाठी योगदान देईल. यामुळे पिंपरी चिंचवडला ओस्लो, लंडन, न्यूयॉर्क आणि मुंबई यांसारख्या जागतिक शहरांच्या पंक्तीत आणले जाईल. या शहरांनी वाढत्या हवामान संकटाचा सामना करण्यासाठी समान आराखडा स्वीकारला आहे. हवामान अंदाजपत्रक प्रशिक्षण कार्यशाळेसाठी स्थापत्य, पर्यावरण, जलनिस्सारण, उद्यान, विद्युत अशा एकूण ६ विभागांना प्राधान्य देण्यात आले. संपूर्ण पदानुक्रमातील एकूण ३२४ महापालिका अधिकाऱ्यांनी हवामान अंदाजपत्रक प्रशिक्षणात भाग घेतला आहे.

### अर्थसंकल्प 2025-26 साठी उद्दिष्टे

- आर्थिक जबाबदारी आणि स्थिरता
- स्मार्ट प्रशासन आणि सार्वजनिक सेवा
- प्रगती शिक्षण आणि कौशल्य विकास
- शाश्वत आणि हवामानाला अनकूल शहरी विकास
- सामाजिक समता आणि समुदायाचे कल्याण

### ही आहेत अर्थसंकल्पाची खास वैशिष्ट्ये

- मनपाच्या विकासकामांसाठी र.रु. १९६२.७२ कोटी इतक्या रकमेची तरतूद केली आहे.
- स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षातंर्गत र.रु. ७५३.५६ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.
- शहरी गरीबांसाठी (BSUP) अंदाजपत्रक तरतूद र.रु. १८९८ कोटी.
- जेंडर बजेट- महिलांच्या विविध योजनांसाठी भरीव तरतूद र.रु. ८३ कोटी.
- दिव्यांग कल्याणकारी योजना तरतूद र.रु. ६२.०९ कोटी
- पाणी पुरवठा विषयक भांडवली विकास कामांकरिता र.रु. ३०० कोटी.
- पी.एम.पी.एम.एल करिता अंदाजपत्रकात र.रु. ४१७ कोटींची तरतूद.
- भूसंपादनाकरिता र.रु. १०० कोटी तरतूद.
- अतिक्रमण निर्मूलन व्यवस्थेकरिता र.रु. १० कोटी तरतूद
- स्मार्ट सिटीसाठी र.रु. ५० कोटी तरतूद
- अमृत २.० योजनेसाठी र.रु. ५५.४८ कोटी तरतूद.

### ग्रीन बॉण्ड काढणारी महाराष्ट्रातील पहिली महापालिका

» पिंपरी चिंचवड महानगरपालिका महसूल वाढीवर विशेष भर देत असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने २८ जुलै २०२३ रोजी म्युनिसिपल बॉण्डद्वारे २०० कोटी रुपये उभारले आहेत. बॉण्डमधून मिळणारी रक्कम पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत मुळा नदी प्रकल्पाच्या विकासासाठी वापरली जाणार आहे. आता हरित सेतू प्रकल्पांतर्गत रस्त्याचे जाळे विकसित करण्यासाठी गवळी माथा चौक ते इंद्रायणी नगर चौकापर्यंत टेल्को रस्ता बांधण्यासाठी ग्रीन बॉण्डद्वारे निधी उभारण्यात येणार आहे. ग्रीन बॉण्डद्वारे निधी उभारणी पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका ठरणार आहे, असेही आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

# विमानतळावर प्रवाशांना पायपीट करावीच लागणार

## पुणे महाराष्ट्र मेट्रो रेलने कार्पोरेशनची (महामेट्रो) रामवाडीपर्यंतच मार्गिका




**पुणे | प्रतिनिधी**

नागरी विमान वाहतूक सुरक्षा विभागाचे (ब्युरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटी – बीसीएएस) निर्देश आणि हवाई दलाच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) बस थांब्याला विमानतळाच्या आत परवानगी देता येणार नसल्याचे विमानतळ प्रशासनकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे पीएमपीच्या बससेवेवर परिणाम होणार असून हवाई प्रवाशांनाही ३०० ते ४०० मीटर दूर पर्यंत पायपीट करावीच लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुणे महाराष्ट्र मेट्रो रेलने कार्पोरेशनची (महामेट्रो) रामवाडीपर्यंतच मार्गिका असल्याने विमानतळापर्यंत जाण्यासाठी 'पीएमपी'ची पूरक (फीडर) बस सेवा सुरू करण्यात आली आहे. मात्र या विमानतळ प्रवेशद्वाराच्या बाहेर ३०० ते ४०० मीटर अंतरावर असलेल्या एरोमॉलच्या ठिकाणीच थांबा देण्यात आला. त्यामुळे 'पीएमपी' प्रशासनाने विमानतळ प्रशासनाला पत्र पाठवून विमानतळाच्या आतील बाजूला (टर्मिनलच्या बाहेरील काही बाजू अंतरापर्यंत) थांबा निश्चित करून द्यावा, जेणेकरून प्रवाशांना सहजरीत्या विमानतळापर्यंतचा प्रवास करता येईल, असेही नमूद करण्यात आले होते. मात्र तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटल्यानंतरही कुठलेच स्पष्टीकरण देण्यात आले नसल्याचे पीएमपीकडून सांगण्यात आले.

सद्य स्थितीला प्रवाशांना एरोमॉलजवळ असलेल्या बहुद्देशीय वाहनतळापासून अवजड बॅग घेऊन टर्मिनल पर्यंत पायपीट करावी लागत आहे. याबाबत प्रवाशांकडूनही तक्रारी करण्यात आल्या. विमानतळ प्राधिकरणाने अखेर 'बीसीएएस'च्या निर्देशानुसार आणि हवाई दलाची जागा असल्याने एरोमॉल परिसराजवळील बहुद्देशीय वाहनतळाच्या ठिकाणीच बसची सेवा राहिल, असे निश्चित केले आहे.

### काय आहे 'बीसीएएस'चे निर्देश ?

**» नागरी विमान वाहतूक सुरक्षा विभागाच्या (बीसीएएस) सुरक्षीततेच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या निर्देशानुसार कोणत्याही विमानतळावर १०० मीटर अंतरापर्यंत खासगी, प्रवासी वाहतूक सेवेतील वाहनांना प्रवेश देऊ नये. जेणेकरून सुरक्षितता आणि प्रवाशांना सुलभ प्रवास करताना अडचण निर्माण होईल.**

त्यामुळे प्रवाशांना एरोमॉलपासून सुरक्षित जीन्याच्या माध्यमातून किंवा रस्ता ओलांडून विमानतळाच्या प्रवेशद्वारून पायपीट करतच हवाई प्रवास करावा लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

> विमानतळाच्या परिसरात प्रवाशांना सहज आणि सुलभ प्रवास करता यावा म्हणून विमानतळ खासगी कार, बस, व्यावसायिक वाहने, प्रवासी बस यांच्यासाठी एरोमॉलच्या ठिकाणी बहुद्देशीय वाहनतळाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विमानतळातून बाहेर पडणाऱ्या प्रवाशांसाठी ३५ आसन असलेली मोफत ई-बस आणि सहा 'गोल्फ कार्ट वाहने' आणि टर्मिनल ते एरोमॉलमधील वाहनतळापर्यंत सरकते जीना आणि पूल निर्माण करून प्रवाशांना सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दरम्यान, बीसीएएसच्या निर्देशानुसार अंमलबजावणी करण्यात येत असून तेथून पुढचा परिसर हा हवाई दलाच्या अखत्यारीतील असून त्यांच्याकडूनही सुरक्षेच्या कारणास्तव परवानगी नाकारण्यात आली असल्याने एरोमॉलच्या वाहनतळापासून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सुविधांचा प्रवाशांना लाभ घ्यावा.
>
> **- संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ.**

# दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मावळात मोफत प्रवास सेवा

## आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकाराने 71 गावांमधील 3600 विद्यार्थ्यांना सुविधा



**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर वेळेत आणि विनासायास पोहोचता यावे, यासाठी आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकाराने 'मावळ डेव्हलपमेंट फाउंडेशन'च्या वतीने मोफत वाहतूक सेवा सुरू करण्यात आली आहे. हा उपक्रम सन २०१६-१७ पासून सुरू असून यंदा नवव्या वर्षात पदार्पण करत आहे. यंदाच्या परीक्षेसाठी ३,६०० हून अधिक विद्यार्थ्यांना या सेवेचा लाभ मिळणार आहे.

इंदोरी, बोरवली, पवनानगर, जांभूळ, ब्राह्मणवाडी, तुंग, निगडे, आंबळे, घोलपवाडी, कदमवाडी, गोळेवाडी, मंगरूळ, निळशी, कुसुर, कुसवली, पवळेवाडी, कल्हाट, भोयरे, कशाळ, सावळा, सांगवी, शिवणे, डोणे, ओवळे, थोरण, वडेश्वर, धनगव्हाण, वारू, कोथुर्णे, मळवंडी, बौर, ओझर्डे, पिंपळवली, पाथरगाव, कार्ला, अजिवली, वराळे, साई, नवीन उकसान, नाणे, सोमाटणे, बेबेडओहोळ, परंदवडी, शिरगाव, गोडुंब्रे, साळुंब्रे, सांगवडे, दारुंब्रे, भोयरे, सुदुंब्रे, आढले बुद्रुक, करुंज, निगडे, देवघर, उकसान आदी ७१ गावांमधील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्रावर जाण्या-येण्यासाठी मोफत प्रवास व्यवस्था करण्यात आली आहे.

**परीक्षा केंद्रे आणि त्यातील विद्यार्थीसंख्या पुढीलप्रमाणे..**

रामभाऊ परूळेकर विद्यानिकेतन, तळेगाव दाभाडे – १०६२ विद्यार्थी

ॲड. पु. वा. परांजपे विद्यामंदिर, तळेगाव दाभाडे – ७१२ विद्यार्थी

श्री शिवाजी विद्यालय, देहूरोड – २८९ विद्यार्थी

संत तुकाराम विद्यालय, देहूगाव – ५८५ विद्यार्थी

सेंट ज्युड हायस्कूल, देहूरोड – ४६१ विद्यार्थी

न्यू इंग्लिश स्कूल, वडगाव मावळ – ७७६ विद्यार्थी

फोर एस इंग्लिश मीडियम स्कूल, देहगांव – ३०४ विद्यार्थी

पवना विद्यामंदीर, पवनानगर – ४४१ विद्यार्थी

पंडीत नेहरु विद्यालय, कामशेत – ६०४ विद्यार्थी

डॉ. बी. एन. पुरंदरे विद्यालय लोणावळा – ३५२ विद्यार्थी

न्यू इंग्लिश स्कूल, चांदखेड – ३२८ विद्यार्थी

ॲड. बापूसाहेब भोंडे हायस्कूल, लोणावळा – ६८४ विद्यार्थी

### 14 परीक्षा केंद्रांवर 7,047 विद्यार्थी

**» महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला मावळ तालुक्यातील १४ परीक्षा केंद्रांवर एकूण ७,०४७ विद्यार्थी बसणार आहेत. या विद्यार्थ्यांसाठी मोफत वाहतूक सेवा उपयुक्त ठरणार आहे.**

ऑक्झीलिअम कॉन्व्हेंट हायस्कूल, लोणावळा – ३६६ विद्यार्थी

संपर्क ग्रामीण विद्याविकास केंद्र भांबर्डे – ७५

**विद्यार्थ्यांसाठी मोलाची सोय..**

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचता येईल आणि परीक्षा संपल्यानंतर घरी परतणे सोयीचे होईल. गेल्या नऊ वर्षांपासून चालू असलेल्या या सेवेमुळे पालक आणि विद्यार्थी समाधान व्यक्त करत आहेत.

या उपक्रमामुळे तालुक्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मोठी मदत मिळत आहे. मागील वर्षीप्रमाणे यंदाही या सुविधेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

विद्यार्थ्यांसाठी ही मोफत सेवा उपयुक्त ठरणार असून, या उपक्रमामुळे परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना मानसिक शांती मिळेल आणि परीक्षेवर अधिक लक्ष केंद्रित करता येईल.

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला ‘सार्वजनिक सेवामध्ये नाविन्यता’ श्रेणीतील ‘इनोव्हेशन ॲवॉर्ड’

## ‘नेट ॲप’ कडून दिल्या जाणाऱ्या पुरस्कार सोहळ्यामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा गौरव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ‘प्रॉपर्टी टॅक्स इम्प्रोव्हमेंट प्रोग्राम’ या प्रकल्पास ‘नेट ॲप’ कडून मिळालेला इनोव्हेशन ॲवॉर्ड, इम्पॉवरिंग बिझनेसेस थ्रू डेटा हा ‘सार्वजनिक सेवामध्ये नाविन्यता’ या श्रेणीमध्ये पुरस्कार प्राप्त झाला. सदर पुरस्कार अंधेरी, मुंबई येथील जे. डब्ल्यू. मॅरियट सहार येथे सोमवार, दि.18 फेब्रुवारी 2025 पार पडलेल्या पुरस्कार सोहळ्यामध्ये प्रसिद्ध क्रिकेटपटू जॉटी ऱ्होड्स यांच्या हस्ते पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांस प्रदान करण्यात आला. यावेळी ‘नेट ॲप’चे कार्यकारी संचालक व उपाध्यक्ष पुनीत गुप्ता व ‘नेट ॲप’चे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि महाव्यवस्थापक क्रिश वितलदेवरा व विविध पुरस्कारार्थी बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अधिकारी आदी उपस्थित होते.



### ‘सार्वजनिक सेवामध्ये नाविन्यता’ श्रेणीमध्ये पिंपरी – चिंचवड महानगरपालिकेची सरशी...

» ‘नेट ॲप’ ही एक आघाडीची डेटा व्यवस्थापनामध्ये अग्रेसर असणारी कंपनी असून गेली अनेक वर्षे डेटाच्या माध्यमातून ज्या संस्था, खासगी कंपन्यांनी आपल्या व्यवसायामध्ये सकारात्मक बदल घडवून सुधारणा केल्या आहेत, अशा आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित असलेल्या ‘नेट ॲप’कडून डेटाच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडविणाऱ्या संस्थांचा दरवर्षी गौरव केला जातो. यामध्ये भारतातील नामवंत बहुराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश असतो. याबरोबर सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थांचा देखील गौरव केला जातो. भारतातील नामांकित अशा खासगी, सरकारी, सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बहुराष्ट्रीय संस्था सदर पुरस्कारासाठी सहभाग नोंदवितात. माहिती तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा व्यवस्थापन आदी क्षेत्रामधील नामवंत ज्यूरींकडून पुरस्कारांची निवड केली जाते. यामध्ये ‘सार्वजनिक सेवामध्ये नाविन्यता’ श्रेणीतील ‘इनोव्हेशन ॲवॉर्ड’ यावर्षी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला प्राप्त झाला असून महानगरपालिकेने राबविलेल्या उपक्रमांचे कौतूक होत आहे.

**महानगरपालिकेच्या ‘या’ पुढाकारांसाठी पुरस्कार...**

1. डेटाच्या आधारे निर्णय प्रक्रियेचा वापर करुन करसंकलनामध्ये वाढ

2. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अपूर्ण मालमत्तांच्या माहितीचे अद्ययावतीकरण

3. माहितीच्या विश्लेषणाच्या माध्यमातून मालमत्तांचा डेटाबेस व त्याबाबतच्या ट्रेंडचे विश्लेषणाचा वापर करुन लक्ष्यित कर संकलनासाठी GIS-आधारित क्लस्टरिंगची अमंलबजावणी

4. नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी सोशल मीडिया, एसएमएस, सार्वजनिक सूचना आणि तक्रार निवारण सत्रांच्या माध्यमातून जनजागृती

5. कर संकलनाचा मागोवा घेण्यासाठी, करदात्यांच्या वर्तनाचे विश्लेषण करण्यासाठी आणि डेटाचा आधार

6. बिल वितरण सुधारणेमध्ये अचूक मालमत्ता पडताळणी आणि रीअल-टाइम बिल ट्रॅकिंगसाठी मोबाइल ॲपचा वापर करुन ‘प्रकल्प सिध्दी’च्या माध्यमातून माहितीचे अद्ययावतीकरण

8. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे ऑनलाइन पेमेंटमध्ये 39% वाढी होऊन कर संकलन ₹625 कोटी (2021-22) वरून ₹977 कोटीं वर पोहोचले.

“पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने करसंकलनामध्ये वाढ होण्यासाठी व विभागाच्या प्रक्रियेमध्ये सुधारणा आणण्यासाठी ‘प्रॉपर्टी टॅक्स इम्प्रोव्हमेंट प्रोग्राम’ या प्रकल्पाचा अवलंब केला. या माध्यमातून माहितीचे विश्लेषण करून संसाधनांचे योग्य वाटप करण्यात आले. याचबरोबर प्रभावीपणे विविध अभियान राबविण्यासाठी मदत झाली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला मिळालेला ‘सार्वजनिक सेवामध्ये नाविन्यता’ श्रेणीतील ‘इनोव्हेशन ॲवॉर्ड’ हा पुरस्कार ही गौरवाची बाब आहे. आता यापुढे महानगरपालिकेच्या सर्व विभागामध्ये माहितीचे विश्लेषणाचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे आता सर्व विभागामधील प्रशासकिय कामामध्ये सुलभता निर्माण होऊन नागरिकांना सेवा देण्याची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होणार आहे.”

-शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

“पिंपरी – चिंचवड महानगरपालिकेने आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनानुसार नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करुन प्रत्येक विभागामध्ये गतिमानता आणण्यासाठी पुढाकार घेतला आहे. याचमुळे ‘नेट ॲप’ने दिलेल्या ‘इनोव्हेशन ॲवॉर्ड’ सारख्या महत्वाच्या पुरस्काराने पिंपरी चिंचवड महागनरपालिकेला गौरविण्यात आले. पिंपरी – चिंचवड महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागामध्ये यापुढे गतिमान प्रशासनासाठी आधुनिक तंत्रज्ञान व माहिती (डेटा) विश्लेषणाची भुमिका महत्वाची ठरणार असून ती राबविण्यासाठी महानगरपालिका आग्रही भुमिका घेणार आहे. नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्ये गतिशिलता आणून त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी येत्या काळामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाची भुमिका महत्वाची असणार आहे.”

- प्रदीप जांभळे – पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका

# पिंपरी-चिंचवडमधील लघु उद्योजकांना लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचा ‘विश्वास’

## मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या बैठकीत सकारात्मक भूमिका; आमदार महेश लांडगे आणि महापालिका अधिकाऱ्यांची उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

कारखानदारी, लघुउद्योग ही पिंपरी-चिंचवड शहराची प्रमुख ओळख आहे. या उद्योग क्षेत्राचा शहराच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. उद्योग, उद्योजक यांच्या पुनर्वसनासाठी लवकरच “ॲक्शन प्लॅन” बनवण्यात येईल. शहरातील लघु उद्योजकांवर अतिक्रमण कारवाई होणार नाही, असा विश्वास लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनी दिला आहे.



मराठा चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे पिंपरी-चिंचवड येथील कार्यालयात बैठक झाली. या बैठकीला भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे उपस्थित होते. यावेळी मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष दीपक करंदीकर, महापालिका उपायुक्त मनोज लोणकर, क क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, फ क्षेत्रीय अधिकारी श्रीकांत कोळप, प्रकाश गुप्ता, गोरख भोरे उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, कुदळवाडी-चिखली येथील अतिक्रमण कारवाईबाबत प्रशासनासोबत बैठक झाली होती. त्यावेळी रस्ते आणि आरक्षणांमध्ये अडथळा ठरणारी, इंद्रायणी नदी प्रदूषण, वायू-ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरणारी आणि अनधिकृत भंगार व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे निश्चित केले होते. पण, प्रशासानाने सरसकट कारवाई केली. त्यामुळे लघु उद्योजक आणि भूमिपुत्रांचे नुकसान झाले आहे. उद्योग, उद्योगक्षेत्र आणि उद्योजक यांच्या सर्व समावेशक विकासासाठी नेहमीच पाठीशी राहण्याची भूमिका भाजपा आणि आमची आहे. यासाठी लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अधिकारी आणि आमची संयुक्त बैठक झाली. कुदळवाडीप्रमाणे सरसकट कारवाई करुन लघुउद्योजक व भूमिपुत्रांना नाहक त्रास होईल, अशी कारवाई प्रशासनाने करु नये, अशी ठाम भूमिका आम्ही प्रशासनासमोर मांडली. उद्योग क्षेत्रासाठी शहरात सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे. नियम-अटी आणि विविध परवानग्यांसाठी महापालिका प्रशासन सर्वोतोपरी सहकार्य करणार आहे. शहरातील कोणत्याही उद्योगाला कुदळवाडीप्रमाणे त्रास होवू नये. यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची जबाबदारी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही घेतली आहे.

-महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# भोरमध्ये निधीअभावी विकासकामे खोळंबली

## नगरपरिषदेचे प्रशासन काळात कामकाज चोख; निधीअभावी अनेक विकासकामे रखडली

**पुणे | प्रतिनिधी**

पालिकेचा 'क' वर्गात समावेश असल्यामुळे शासनाचा म्हणावा तसा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे विकासकामे थांबली आहेत. विशेष म्हणजे, प्रशासक विराजमान झाल्यापासून तर विकासकामांना ब्रेकच लागला, असेच म्हणावे लागेल.

भोर नगरपरिषदेवर 27 जुलै 2023 पासून प्रशासक विराजमान झाले आहेत. मात्र, प्रशासकीय काळात नागरिकांना आरोग्य समस्या, वीज, पाणी या मूलभूत गरजा मिळत असल्या, तरी नागरिकांचे म्हणावे असे प्रश्न सुटत नाहीत. रात्रीच्या वेळी अनेक ठिकाणी पथदिवे बंद असतात तसेच शहराच्या प्रवेशद्वाराजवळ कचऱ्याचे ढीग दिसतात. अनियमित पाणीपुरवठा, मोकाट कुत्रे, डुकरे यांचा उच्छाद अशा समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागते.

माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेवर काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता असताना त्यांनी त्यांच्या कार्यकाळात शहरासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणून भोर नगरपालिकेचे रूप बदलले.

त्यांच्या काळातील शहरातील स्वीमिंग पूल, शनी घाटाचे सुशोभीकरण, व्यापारी बाजार संकुल, लोकमान्य टिळक मार्केट, महात्मा फुले भाजीमंडई ही कामे पूर्णत्वास गेलेली दिसत नाहीत. प्रशासन काळात सुरू असलेल्या विकासकामांना निधीची कमतरता असल्यामुळे म्हणाव्या तशा गतीने ही कामे सुरू नाहीत.

सन 2011 च्या जनगणनेप्रमाणे शहराची लोकसंख्या 18 हजार असताना रोजगाराबाबत भोर नगरपालिकेच्या हद्दीत मिनी एमआयडीसीची उभारणी झाली नसल्यामुळे अनेक तरुण बेरोजगार आहेत. परंतु, हा मुद्दा प्रशासन काळात सुटेल का? असा प्रश्न तरुणवर्गातून होत आहे. भोर शहरात प्रशासन काळात सुरू असलेल्या विकासकामामध्ये राजकीय नेत्याचा हस्तक्षेप मोठा असल्यामुळे विकासकामे करताना अधिकारी, कर्मचारी यांच्यापुढे अडचणी उभ्या राहत आहेत. यामध्ये श्रेयवाद घेण्यासाठी मोठी रस्सीखेच सुरू आहे.

विद्यमान आमदार शंकर मांडेकर यांनी भोर नगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासोबत दोन आठवड्यांपूर्वी बैठक घेऊन शहरातील विकासकामांचे प्रस्ताव सादर करा, असे निर्देश दिले. तसेच शहरातील बेकायदेशीर असणारी बांधकामे, वाढती अतिक्रमणे, यावर ताबडतोब कारवाई करण्याचे आदेश दिले असताना देखील प्रशासनाने अतिक्रमण करणाऱ्यांवर नोटिसा बजावून कारवाई केली. परंतु, पुन्हा 'जैसे थै' परिस्थिती राहत असल्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे.




### 'क' वर्ग असल्यामुळे मोठ्या निधीची आवश्यकता

» जिल्ह्यात 'क' वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भोर नगरपरिषदेचे प्रशासन काळात कामकाज उत्तमरीतीने सुरू आहे. पालिकेत नागरिकांच्या हाताच्या बोटाएवढ्या तक्रारी असल्यामुळे त्या तक्रारी अधिकारी, कर्मचारी व्यवस्थित सोडविण्याचे काम करत असतात. मात्र, पालिकेचा 'क' वर्गात समावेश असल्यामुळे शासनाचा म्हणावा तसा निधी उपलब्ध होत नाही. येथे मोठ्या निधीची आवश्यकता आहे.

### जुन्याच करप्रणालीने वसुली सुरु

» सन 2023-24 मध्ये प्रशासकीय राज लागू होण्यापूर्वी भोर शहरातील करामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली गेली होती. परंतु, माजी आमदार संग्राम थोपटे यांनी लक्ष घालून ती स्थिर करण्याचे काम केले असल्यामुळे मालमत्ता कर असणाऱ्या नागरिकांना त्यांच्या जागेप्रमाणे कर लागू करून त्याची वसुली सुरू आहे.

### विकासकामांवरून मोठा श्रेयवाद

» प्रशासन काळात श्रेयवादाच्या लढाईत अडकलेल्या विकासकामांना शासनाने निधी दिला, तर ही कामे सुटण्याची शक्यता नागरिकांना वाटू लागली आहे. नगरपालिकेवर काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता असताना त्यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे केली. मात्र, प्रशासन काळात त्या कामावरून माजी-भावी नगरसेवकांतून श्रेयवाद होत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

# 30 एप्रिलपर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसवा, अन्यथा....; आरटीओने दिला इशारा

## राज्य परिवहन विभागाने 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट' अर्थात एचएसआरपी नंबर प्लेट 2019 च्या पूर्वीच्या वाहनांना बसवण्यासाठी एका महिन्याची मुदतवाढ

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य परिवहन विभागाने 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट' अर्थात एचएसआरपी नंबर प्लेट 2019 च्या पूर्वीच्या वाहनांना बसवण्यासाठी एका महिन्याची मुदतवाढ जाहीर केली आहे. त्यानुसार आता वाहनचालकांना 30 एप्रिलपर्यंत ही नंबरप्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या तारखेआधी एचएसआरपी नंबरप्लेट बसवलेली नसल्यास आरटीओ विभागाकडून कारवाई केली जाणार आहे.

सुरूवातीला यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, आता या मुदतीमध्ये एका महिन्याची वाढ करण्यात आली आहे. 2019 पूर्वीच्या पुणे प्रादेशिक परिवहन विभागात जवळपास 25 लाख वाहने आहेत. त्यामुळे परिवहन विभागाने ही नंबरप्लेट बसवण्यासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली जात होती. त्यानुसार यात वाढ करण्यात आली आहे.

एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यासाठी एका कंपनीला यासंबंधीचे सर्व काम देण्यात आले आहे. 2019 पूर्वीच्या एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्याचे आदेश आरटीओंनी काढले आहेत. ही नंबर प्लेट बसवायला सुरूवात झाली असून, वाहनधारकांकडून याला कमी प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

TRANSPORT.MAHARASHTRA.GOV.IN या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करावी लागेल. यानंतर फिटमेंट सेंटरची लिस्ट सिलेक्ट करावी लागेल. या लिस्टमध्ये तुमच्या जवळच्या सेंटरचे नावाची निवड करावी लागेल. त्यानंतर तुम्हाला मिळालेल्या तारखेच्या दिवशी फिटमेंट सेंटरला जावे लागेल आणि तिथे गेल्यावर वेंडर आपल्या वाहनाला नंबर प्लेट बसवून देईल. त्याची नोंद वेंडर वाहन प्रमाणीत करेल.



### अशी रक्कम द्यावी भरावी लागणार

» टू व्हिलर आणि ट्रॅक्टरसाठी 450 रुपये + जीएसटी
» थ्री व्हीलरसाठी 500 रुपये + जीएसटी
» फोर व्हीलर आणि इतर वाहनांसाठी 745 रुपये + जीएसटी

### आतापर्यंत 10 हजार वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट

» आता 30 एप्रिलनंतर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट नसेल्यास अशा वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. यामुळे लवकरात लवकर नंबर प्लेट बसवून घ्याव्यात, असे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे. पुण्यात 2019 पूर्वीची 25 लाख वाहने आहेत. पैकी केवळ 10 हजार वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसवले असून 25 लाख वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट बसवणे बाकी आहेत.